
डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान संचलित
श्रीगुरुजी रुग्णालय, नाशिक.

# जिव्हाळा

एक स्नेहबंध ....


वर्ष २ रे अंक ६ वा
जुलै २०१२

## कर्करोगानंतरचे आयुष्यसुद्धा सुंदर असू शकते



कॅन्सरशी लढताना... !

३ जून
नॅशनल कॅन्सर सर्व्हायव्हर्स डे




त्रैमासिक जिव्हाळयाच्या पाचव्या अंकाचे प्रकाशन करताना मान्यवर



विधानपरिषद विरोधी पक्षनेते ना. श्री. विनोद तावडे यांचे स्वागत करताना श्री. प्रविण बुरकुले



रुग्णालयाला देणगीचा धनादेश देताना आयुर्वेद व्यासपीठाचे वैद्य विनय वेलणकर सोबत आबा शिंगणे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
वैद्यकीय प्रतिष्ठान संचलित
**श्रीगुरुजी रुग्णालय**
दुसरा मजला, उमिया अपार्टमेंट,
डॉ. हेडगेवार चौक, कॅनडा कॉर्नर,
नाशिक - ४२२ ००५
दूरध्वनी - २३१८६०१/२३१८६०२
**www.shrigurujirugnalaya.com**

जिव्हाळा - त्रैमासिक
वर्ष २ रे, अंक ६ वा, जुलै २०१२

मार्गदर्शक
**डॉ. विनायक गोविलकर**
संपादक
**श्री रवींद्र बेडेकर (९७६६७११९१८)**
ravibedekar@yahoo.com
मुद्रक/प्रकाशक
**डॉ. राजेंद्र खैरे (९४२३७२४०५१)**
कार्यवाह
श्रीगुरुजी रुग्णालय
**संपादक मंडळ**
श्री. प्रकाश भिडे
श्री. गजानन होडे
सौ. वैशाली शहाणे (सोनार)
प्रा. सौ. वृंदा गुडसुरकर
डॉ. गिरीश बेद्रे
डॉ. अभिजित मुकादम
मोबाईल : ८३८००११२७८
abhizone3@gmail.com

अक्षरजुळणी, सजावट व मुद्रण
**अल्टीमेट इंप्रेशन्स,**
१९, विकास कॉलनी, इंडियन आईल
पेट्रोल पंपासमोर, त्रिंबक रोड, नाशिक.
फोन : ०२५३-२३५२५३०

**द्वैवार्षिक वर्गणी रु. १००/-**
**त्रैवार्षिक वर्गणी रु. १५०/-**
**या अंकाचे देणगी मूल्य रु. १५/-**

# संपादकीय ...

प्रिय वाचक मित्रहो.....

वर्षाऋतुचे आगमन उशीराने का होईना झाले आहे त्यामुळे उन्हाची झळ कमी होऊन वातावरण आल्हाददायक झाले आहे. या सुखद वातावरणात 'जिव्हाळा' चा सहावा अंक आपल्या हाती देत आहोत.

या अंकात नवीन लेखकांना आपल्या भेटीस घेऊन येत आहोत. मुखपृष्ठ कथा म्हणून ' National Cancer Survivors Day' च्या निमित्ताने प्रसिध्द लेखिका सौ. वंदना अत्रे यांचा अत्यंत वाचनीय व स्फूर्तीदायक लेख या अंकात वाचायला मिळेल. त्याचबरोबर श्रीगुरुजी रुग्णालयातर्फे कातकरी समाजाचे जे सर्वेक्षण करण्यात आले, त्याबद्दल विस्तृत विवेचन डॉ. विक्रांत मुंगी यांनी केले आहे.

तसेच पावसाळ्यामध्ये दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजाराबद्दल डॉ. कृष्णा गिरी यांनी अतिशय उपयुक्त माहिती दिली आहे. त्याचबरोबर आपल्या पुस्तक परिचय या सदरात डॉ. वि. ना. श्रीखंडे ह्यांच्या '... आणि दोन हात' ह्या वाचनीय आणि संग्रही असावे अशा पुस्तकाचा परिचय करून देत आहोत.

आपल्या रुग्णालयाच्या नूतन वास्तूच्या दक्षिण भागाचे कामही जोरदार चालू असून एकाच वेळी प्लंबिंग, वायरींग आणि फ्लोरींगच्या कामाने वेग पकडला आहे.

वाचकहो, आम्हास आपल्या 'जिव्हाळ्या' बद्दल अजिबात शंका नाही परंतु आपणाकडून आम्ही प्रतिक्रिया जाणू इच्छितो, कारण आपल्या मौलिक सूचना आणि मार्गदर्शनाने हे नाते अधिक दृढ होण्यास मदत होईल अशी आम्हास खात्री आहे.

'जिव्हाळा' वृद्धिंगत होवो !

-- रवींद्र बेडेकर

# पावसाळा आणि साथीचे आजार



डॉ. कृष्णा गिरी
(एम.डी., मेडिसिन)
९९७५७५३७६३

अनेक लोकांचा आवडता ऋतू म्हणजे पावसाळा. सगळीकडे दाटलेली हिरवळ, मुबलक पाणी आणि पाण्यात चिंब होणारी लहान थोर मंडळी. पण त्याबरोबरच उद्भवतात काही आजार आणि समस्या. या सर्व आजारांबद्दलची मूलभूत माहीती आपणास व्हावी या हेतूने हा लेख तयार केला आहे. या लेखाच्या अनुषंगाने काही आजार आपल्याला टाळता आले तर आपला हेतू साध्य होईल.

पावसाळ्यात होणाऱ्या काही आजारांवर आपण एक दृष्टीक्षेप टाकू.

पावसाळ्यात होणारे आजार खालील प्रमाणे आहेत.

१) सर्दी, पडसे.
२) मलेरिया
३) कॉलरा आणि गॅस्ट्रो
४) विषमज्वर (टाइफाईड)
५) कावीळ- हिपॅटायटिस (प्रकार A,E)
६) डेंग्यु आणि लेप्टोस्पायरोसीस

**१) सर्दी, पडसेः-** पावसात सर्वांनाच भिजायला आवडते पण आपल्याला त्याची बरेचदा किंमत देखील मोजावी लागते, ती म्हणजे सर्दी, पडसे आणि खोकला या स्वरूपात. सर्दी, पडसे सर्व वयोगटातील लोकांना होऊ शकते. सारख्या शिंका येणे, घसा खवखव करणे आणि बारीक ताप देखील येणे, ही याची काही लक्षणे आहेत. सर्दी, पडसे यापासून वाचायचे असेल तर पावसात भिजणे टाळावे. हे जर शक्य नसेल तर बाहेरून आल्यावर डोके स्वच्छ टॉवेलने कोरडे करावे. गरम पाण्याची आंघोळ करणे शक्य झाल्यास उत्तम. गरम दूध, चहा किंवा कॉफी घ्यावी. थंड वस्तू जसे आईस्क्रीम, फ्रिजमधील पाणी टाळावे. एअरकंडीशनर (A.C.) चे तापमान जास्त ठेवावे.

सर्दी झालीच तर हळदीचे दूध, आल्याचा चहा घ्यायला हरकत नाही, परंतु लहान मुलं, वयस्कर गृहस्थ असतील तर डॉक्टरचा सल्ला घेणे योग्य. खूप ताप असल्यास डॉक्टरांना दाखवावे.

**२) मलेरिया :-** पावसाळ्यातील हा आणखी एक सामान्य आजार, लाखो लोक या आजाराचे भक्ष्य बनतात. साचून राहिलेल्या पावसाच्या पाण्यात वाढणाऱ्या डासांमुळे हा आजार होतो. दर दोन-तीन दिवसाला ताप येणे, थंडी वाजून येणे, शरीरात वेदना होणे, कावीळ होणे, कोमेजून जाणे ही या आजाराची लक्षणे होत. यावर घरगुती उपाय करू नयेत. त्वरीत डॉक्टरची भेट घेऊन रक्त तपासून घेणे गरजेचे असते. कारण वेळीच उपचार केले नाहीत तर आजार गंभीर होऊ शकतो.

पण मलेरिया होऊ नये म्हणून काही काळजी घ्यावी. पाण्याच्या साठ्यावर DDT फवारावी, मच्छरदाणी वापरावी किंवा मच्छरांना पळवणारी साधने (Repellent) वापरावीत. कुंडी किंवा कुलरमधील ज्यादा पाणी काढून टाकावे.

**३) कॉलरा आणि गॅस्ट्रो :-** दूषीत पाण्यातून होणारा हा आजार होय. अतिप्रमाणात जुलाब होणे, उलटी होणे, प्रचंड थकवा येणे, शरीरातील पाणी कमी होणे अशी याची काही लक्षणे आहेत. वेळीच लक्ष न दिल्यास शरीरातील पाणी कमी होऊन रुग्ण दगावण्याची भिती सुध्दा असते.म्हणून शरीरातील पाणी व क्षार पूर्ववत करणे गरजेचे असते. त्यासाठी ORS हे अत्यंत उपयुक्त असते.

गॅस्ट्रो टाळण्यासाठी स्वच्छता पाळणे, बाहेरचे अस्वच्छ पाणी टाळणे, रस्त्यावरील पदार्थांचे सेवन टाळणे, पाणी उकळून थंड करून पिणे किंवा शुध्द पाणी (प्रक्रिया केलेले) वापरणे गरजेचे आहे.

**४) टाइफॉईड :-** अत्यंत उच्च ताप येणे, पोटात दुखणे, अन्न पदार्थ खाण्याची इच्छा न होणे ही टाइफॉईडची लक्षणे आहेत. दूषित व बाहेरचे अन्न खाल्ल्याने होणारा हा आजार आहे. वैद्यकीय सल्ला घेऊन वेळीच यावर उपचार घेणेच योग्य. हा आजार होऊ नये यासाठी बाहेरचे विषेशतः रस्त्यावरील पदार्थ टाळावेत, अशुध्द पाणी पिऊ नये.

**५) कावीळ ( हिपॅटायटिस प्रकार ए आणि इ ):-** पावसाळ्यात माश्यांची संख्या देखील वाढते आणि त्या अन्नपदार्थावर बसून हे विषाणू पसरविण्याचे काम करतात. जेवण अचानक कमी होणे, डोळे, लघवी पिवळी होणे, उलटी, मळमळ, ताप येणे अशी या आजाराची लक्षणे आहेत. अशी लक्षणे आढळल्यास डॉक्टरांशी संपर्क साधावा. पण कावीळ होऊच नये यासाठी लसीकरण करणे, बाहेरचे पदार्थ, अशुध्द पाणी टाळणे हे उपाय करावेत.

**६) डेंग्यु आणि इतर आजार :-** या आजाराची उत्पत्ती डासांद्वारे होते. एडीस नावाच्या डासांमुळे होणाऱ्या या आजारात ताप येणे, शरीरात अत्यंत वेदना होणे, रक्त बिंबीका कमी होणे (platelets), रक्तदाब कमी होणे ही लक्षणे आढळतात. तातडीने उपचार न झाल्यास रक्तस्त्राव होऊन रुग्ण दगावण्याचीसुद्धा शक्यता असते. त्यामुळे अशा लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. आजार होऊ नये यासाठी डासांपासून स्वतःचे संरक्षण करणे, साचलेल्या पाण्याचा निचरा करणे गरजेचे आहे.

खाली दिलेल्या काही बाबींचा अवलंब करावा त्यामुळे काही आजार टाळता येतील.

१) स्वच्छ आणि भरपूर पाणी प्यावे.

२) पावसापासून स्वतःचे रक्षण करावे.

३) पावसात भिजल्यास गरम पाण्याची आंघोळ करावी किंवा डोके आणि अंग स्वच्छ पुसावे.

४) वैयक्तिक स्वच्छता ठेवावी.

५) सकस, सात्विक आणि संतुलीत आहार घ्यावा.

६) लहानांची व वृध्दांची विशेष काळजी घ्यावी.


*श्रावण मासी हर्ष मानसी,*
*हिरवळ दाटे चोहीकडे*
*या सूचनांचे पालन करिता,*
*ना कोणी मग आजारी पडे ।*

लवकरच रुग्णालयात पूर्णवेळ रूजू होणारे डॉक्टर...

**डॉ. सुप्रिया सचिन देवरे ( हंबीरे )**

डॉ. सुप्रिया यांनी बी. जे. मेडिकल कॉलेज ऑफ पुणे येथून एम.बी.बी.एस. केले असून **स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र** या विषयात के. ई. एम. हॉस्पिटल, मुंबई येथून एम.एस. केले आहे. लवकरच त्या आपल्या रुग्णालयात पूर्णवेळ तज्ज्ञ डॉक्टर म्हणून रूजू होणार आहेत.

# कॅन्सरशी लढताना... !




सौ. वंदना अत्रे
vratre@gmail.com

"कॅन्सरमधून पूर्णपणे बरा झालेला रुग्ण मी आज प्रथमच बघतोय" माझ्याकडे आपादमस्तक बघत ते गृहस्थ उद्गारले. त्यांच्या नजरेत होता आश्चर्यमिश्रीत अविश्वास आणि मनात असंख्य प्रश्न. या घटनेतील माझ्या दृष्टीने आश्चर्याची बाब म्हणजे हा भला माणूस डॉक्टर होता आणि जठराच्या कर्करोगावर उपचार घेत होता! आधुनिक तंत्रज्ञान, विज्ञान आणि उपचार युगात जगणारी आणि तरीही कॅन्सरसारख्या काही आजाराविषयी अनेक गैरसमज, भीती, अज्ञान असलेली माणसं आजही समाजात आहेत याची जाणीव मला या गृहस्थांनी परत एकदा करून दिली. अनेक प्रकारची संशोधने, अभ्यास, उपचार पध्दतीमधील आधुनिक तंत्र येऊनही कॅन्सर नावाच्या राक्षसाचे भय अजून आमच्या समाजमनातून गेलेले नाही, याचे नेमके काय कारण असावे ? कोणत्याही आजाराला भिडण्याची जी एक मानसिकता लागते तीच आमच्या समाजात अजून रुजली नाही का ?

आपण सगळे आपल्या शरीरावर खूप प्रेम करतो पण तें बाह्य रुपावर, म्हणून तर विविध प्रकारची क्रीम्स, परफ्युम्स, साबण, शाम्पु वापरून आपण त्याची काळजी (?) घेतो. तऱ्हे-तऱ्हेच्या ब्रँडेड, नखरेल कपड्यांची खरेदी त्याच्यासाठी करतो आणि टीव्हीच्या जाहिरातीमधून दिसणाऱ्या खाद्यपदार्थांचा मारा या शरीरावर करतो, पण या सगळ्या धावपळीत स्वत:च्या शरीराशी खरोखर स्वस्थपणे संवाद कधी करतो का? त्याने दिलेले इशारे,संकेत आपल्या कानावर पडतात का? असं म्हणतात की एखादं झाड जेव्हा निष्प्राण होऊन खाली कोसळते तेव्हा ती घटना अकस्मात, एकदम घडत नाही. कित्येक महिने आधी ती क्रिया झाडाच्या गाभ्यात सुरू झालेली असते. निष्प्राण होऊन कोसळणे हा त्याचा शेवटचा, आपल्या डोळ्यांना दिसणारा एक भाग असतो. आपल्या शरीराचेही तसेच आहे. कॅन्सरसारख्या मोठ्या आजाराने आक्रमण करण्यापूर्वी लहान-सहान (आपल्याला वाटणाऱ्या!) बाबीतून आपली तक्रार, कुरकुर शरीर व्यक्त करीत असते. भूक न लागणे, झोप न येणे, केस गळणे, त्वचा काळवंडणे, वारंवार उदास, निराश वाटणे, थकवा येणे, निरूत्साही वाटणे हे सगळे शरीराचे इशारे असतात; आपले लक्ष वेधून घेण्यासाठी दिलेले, पण त्याकडे दुर्लक्ष करीत आपण आपले शरीर तसेच दामटवत असतो, जुजबी औषधोपचारावर निभावून नेत असतो. दिवसातून एकदा स्वस्थपणे शरीराच्या या तक्रारी ऐकाव्यात, त्यामागची कारणं जाणून घ्यावीत असं आम्हाला कधीच वाटत नाही आणि तरीही आम्ही म्हणतो माझ्या शरीरावर माझे प्रेम आहे !

खरं म्हणजे आपलं शरीर आणि त्यातील लक्षावधी पेशी या एखाद्या आज्ञाधारक मुलासारख्या आहेत. तुम्ही आज्ञा द्याल त्याचे निमुटपणे पालन या पेशी करतात पण त्यासाठी त्यांच्याशी दोस्ती करावी लागते आणि तुम्हाला त्यांच्याकडून काय हवे आहे हे त्यांना वारंवार स्पष्टपणे सांगावे लागते. माझ्या आजारपणात हा प्रयोग मी



# सुंदर आयुष्यासाठी सुंदर गुंतवणुक

संस्कार, तत्व, विचार व कृती यातुनच आपलं आयुष्य सुंदर बनते. पण ते साकारण्यासाठी आवश्यक असते ते सभोवतालचे पोषक वातावरण जे तुम्हाला यशश्रीच्या प्रत्येक गृहप्रकल्पात मिळते.




सुवास्तू

- पाहुण्यांसाठी गेस्ट हाऊस
- सुंदर आरोग्यासाठी जीम व मेडीटेशन हॉल
- प्रत्येक मजल्यावरील अंगण
- बाल गोपालांसाठी चिल्ड्रन प्ले
- ज्येष्ठांसाठी बगीचा
- गृहीणीसाठी गॅस पाइपलाईन व सर्व्हंट क्वार्टर
- मुलांचे उज्वल भविष्यासाठी पाळणाघर व चिल्ड्रन ॲक्टीविटी सेंटर
- आणखी खुप काही फक्त यशश्री मधेच




श्री हरी १५ लाखापासुनपुढे*

अश्या सुंदर प्रकल्पात आपल्यापैकी अनेकांनी घरकुल आपलेसे केलेच, पण काहींनी योग्यवेळी गुंतवणुकीचा निर्णय घेत जास्तीत जास्त मोबदलाही मिळवला आहे. मग वाट कसली बघताय मुहुर्त वेळ पंचांग न बघता लगेच निर्णय घ्या. कारण ज्या क्षणी आपण आपल्या मनाचं ऐकाल. तोच सर्वोत्तम मुहुर्त असेल!

तेव्हा थोडी घाई करा गुंतवणुकीची अशी संधी आणि निरंतर सुंदर वास्तु रोज रोज मिळत नाही.

## श्री यशश्री ग्रुप, नाशिक

CONSTRUCTION WITH PERFECTION

फोन :(0253) 2384255, 2029255 मो. 9422702375

Website: www.sycpl.com




ठाणे येथील रुग्णालयाच्या कार्यक्रमात बोलताना TJSB बँकेचे चेअरमन श्री. विद्याधर वैशंपायन.



लखमापूर येथील आरोग्य तपासणी शिबीरात तपासणी करताना स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. ज्योती शेवाळे



श्रीगुरुजी रुग्णालयाच्या नूतन वास्तूचे प्रगतीपथावर असलेले काम ...

रोज नियमितपणे केला, वारंवार केला. काय हवे होते मला ? मला माझे आरोग्य पूर्ववत् हवे होते. जे उपचार मी घेत होते ते माझ्या आजारावर उत्तम पणे लागू पडावे असे मला वाटत होते. त्या उपचारातून कोणतीही नवी गुंतागुंत होऊ नये असे वाटत होते. या उपचारादरम्यान अनेक टॉक्सिक घटक माझ्या शरीरात जाणार होते ते सहन करण्याची मदत मला माझ्या पेशींकडून हवी होती. या सगळ्या गोष्टी मी उपचारादरम्यान माझ्या शरीराला सतत सांगत होते. या संवादात मी त्याची क्षमा मागत त्याला म्हटले, बाबारे, तुझे इशारे मी धुडकावले, दुर्लक्षिले त्यामुळे आता तुला ऑपरेशनसारख्या, किमोसारख्या दिव्यांना सामोरे जावे लागते आहे पण यापुढे हा संवाद तुटणार नाही, तुझ्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष होणार नाही आणि माझ्या शरीराने माझी ही प्रार्थना ऐकली. अनेक वेळा मला असा प्रतिसाद दिला की कृतज्ञतेने मन आणि डोळे भरून यावे.

कोणत्याही आजाराला तोंड देणे म्हणजे केवळ डॉक्टरांकडे जाऊन तपासणी करणे, वेळेवर औषध घेणे, शरीरावर टॉनिकचा मारा करणे एवढेच नाही. मला वाटते ती एक उपासना आहे. आरोग्याची उपासना, प्रकाशाची उपासना ! प्रकाश म्हणजे जीवन आणि अंधार म्हणजे मृत्यू. जीवन हवे असेल तर आजारपणाच्या काळात रोज प्रकाश देणाऱ्या सूर्याची, त्याच्या तेजाची प्रार्थना करायला हवी. आपण दुर्दैवाने या काळात सतत मृत्यूच्या भयाने ग्रासलेले असतो. सतत त्याचाच विचार करीत असतो. म्हणून आजारपणात आपण कसे वागतो ? झोपून कधीही उठतो. प्रसन्न नीटनेटके राहण्याचा प्रयत्न करीत नाही, सतत लोळत राहतो. आपली कामे कोणीतरी करून द्यावीत अशी अपेक्षा करीत राहतो आणि मुख्य म्हणजे माझा आजार कसा गंभीर आहे, मला कसा त्रास होतोय याची गाऱ्हाणी गात राहतो. इतक्या नकारात्मक वातावरणात वावरणाऱ्या माणसाकडे प्रकाश, उजेड येईल तरी कसा ?


झाडाचेच उदाहरण देऊन पुन्हा सांगायचे तर, असे म्हणतात की संपूर्ण झाडाची इच्छा नसेल तर त्याचे एक पान सुध्दा गळून पडत नाही. आपल्या शरीराची आणि मनाची इच्छा नसेल तर आपल्या शरीरातील एक पेशीसुध्दा वावगे वागत नाही. पण त्यासाठी आपली इच्छा काय आहे हे आपल्याला ठाऊक हवे नां ! त्या इच्छेच्या पूर्तीसाठी नियमितपणे प्रयत्न करायला हवे. रोजचा नियमित व्यायाम, प्राणायाम आणि शरीराशी मनापासून, स्वस्थ संवाद असेल तर मृत्यूही अशा व्यक्तिला स्पर्श करण्यापूर्वी दहावेळा विचार करतो असे आपले पूर्वज लिहून गेले आहेत.

(लेखिका या प्रसिध्द पत्रकार असून त्या स्वत: कॅन्सरच्या रुग्ण होत्या व त्या आता पूर्णपणे कॅन्सरमुक्त झाल्या आहेत. सध्या त्या आपल्या व्यवसायाव्यतिरिक्त कॅन्सर रुग्णांच्या समुपदेशनाचे कार्य करतात.)

## विशेष

नाशिक मधील जेष्ठ संघ कार्यकर्ते श्री आबा शिंगणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी आयुर्वेद व्यासपीठाच्या सहकार्याने सूर्यनमस्कारावर एक छोटी पुस्तिका तयार करून ६२ विविध शाळांमध्ये अल्प दरात वितरीत करून त्याद्वारे जमा झालेले रु. ७५०००/- श्रीगुरुजी रुग्णालयाच्या आयुर्वेद विभागाच्या विकासासाठी दिले. विवेकानंद स्मारकाच्या वेळी ज्याप्रमाणे प्रत्येकी केवळ एक रुपया गोळा करून मोठा निधी श्री एकनाथजी रानडे यांनी उभा केला होता, त्याप्रमाणे आमच्या सारखे सामान्य कार्यकर्ते केवळ इच्छा शक्तीच्या बळावर मोठे काम करून दाखवू शकतात अशी आगळी वेगळी भूमिका श्री आबांनी रुग्णालयात झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात मांडली. यावेळी आयुर्वेद व्यासपिठाचे वैद्य विनय वेलणकर, वैद्य विजय कुलकर्णी, वैद्य रजनी गोखले व व्यासपीठाचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# कातकरी सर्वेक्षण




डॉ. विक्रांत मुंगी
ग्रामीण / सेवावस्ती
आरोग्य प्रकल्प प्रमुख
९९२३३२२८३०
vikrant_mungi@rediffmail.com


वाघाच्या जबड्यात घालूनी हात
मोजितो दात जात ही आमुची ।
पहा चाळूनी पाने पाने
आमुच्या इतिहासाची ।।

असा हा आपला शूर वीर वनवासी समाज. परंतु काळाच्या ओघात तो आपली ओळख हरवून बसला. महाराष्ट्रातील वनवासींचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनामध्ये अत्यंत महत्वाचे स्थान आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून वनवासी समाज हा आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. शेती व्यतिरिक्त वनोपजे गोळा करणे, गवत कापणे इत्यादी धंदे पोटासाठी या समाजास करावे लागत. साधी राहणी, सचोटी, प्रामाणिकपणा, देववादी, निसर्गाच्या सानिध्यात रमणारा, बकऱ्या, कोंबडे, मासे, खेकडे खाणारा, त्यास हवे ते निसर्गातून व सभोवतालच्या साधनातून मिळविण्याचा प्रयत्न करणारा वनवासी समाज हा आजही आढळतो. निसर्ग आणि प्राणी यांची धार्मिक रूढी परंपरेने पूजा करणारा हा समाज भूत-पिशाच्च देखील देवा समान मानून त्यांच्या निर्मूलना करीता भगतावर अवलंबून राहतो. रोगराईत देखील औषधोपचार न घेता दैवी कोप समजून रूढी परंपरागत उपाय भगताकडूनच करून घेतो. पंचायत, लग्न, मृत्यू या निमित्ताने एकत्र आलेल्या पाहुण्यांना, नातेवाईकांना दारू पाजण्याचा कार्यक्रम आवर्जून करतो. त्यांची लग्ने वयात आल्यानंतर म्हणजे १५ ते १६व्या वर्षातच होतात (आता कालानुरूप बदल होत आहे.) मूलतः प्रामाणिक स्वभावाचा पापभिरू वनवासी कर्जाच्या ओझ्याखाली वावरत असतो.

**कातकरी**

इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांच्या मते कातकरी इ.स. पूर्व ५ हजार ते ६ हजार वर्षांसून सह्याद्रीच्या कुशीत राहत असावेत. महाराष्ट्राचे ते आद्य रहिवासी असावेत. 'कृती' म्हणजे कातडे 'पट्टीन' म्हणजे वापरणारे या वरून "कृतिपट्टीन" या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश होऊन कातवाडी नाव पडले असावे. कातवाडी, काथोडी, काठोडी अथवा कातकरी. आपली उत्पत्ती श्रीरामाच्या वानर सेनेपासून झाली असेही कातकरी सांगतात. हे खऱ्या अर्थाने गिरीजन होते. त्यांचा धंदा मुख्यतः खैराच्या झाडापासून काथ (कात) तयार करण्याचा म्हणून ते कातकरी. कातकरी प्रामुख्याने रायगड जिल्ह्यात आढळतात. कातकरी हे रंगाने काळे, ठेंगणे, काटक,राकट व चपळ असतात. या समाजाचे अन्न म्हणजे नाचणी, वरी यांच्या भाकरी, भात, मासे, खेकडे व कंदमुळे. रानउंदिर, खार, होले (कवडे) मोर ही ते खातात. त्यांची उपजीविका शेती मजूरीवर अवलंबून असून ते कंदमुळे, फळे, जळाऊ लाकडाच्या मोळ्या विकतात. बिळे खणून उंदिर पकडणे हा त्यांचा उन्हाळ्यातील एक उद्योग. रानडुकराची शिकार करण्यासाठी बापये, बाया, पोरे सारा दिवस घालवतील. पाणी उपसून मासे पकडण्यातही ते पटाइत असतात. कातकरी एकाच जागी स्थिरावतील याची

खात्री नाही. अशा या उडत्या पाखरांना देखील आपल्या रूढी परंपरांचा अभिमान म्हणून माणूस मेल्यावर प्रेताला बजावतील,

बामन व्हशिल त् लिखू लिखू मरशील,
वाणी व्हशिल त् इकू इकू मरशील,
कातोडीना जन्म यशील त् रानना राजा व्हशील.

**सर्वेक्षण**

या सर्व पार्श्वभूमीवर वनवासी लोकांच्या विकासासाठी म्हणून सरकारने आदिवासी विकास विभागाची स्थापना केली आहे. त्याअंतर्गत येणाऱ्या 'आदिवासी विकास प्रकल्प', नाशिक यांनी पेठ, इगतपूरी व त्रंबकेश्वर ह्या तालुक्यातील कातकरी समाजाचे आर्थिक, सामाजिक व वैद्यकियदृष्ट्या सर्वेक्षण करण्याचे ठरविले. या कामासाठी त्यांनी अनेक संस्थांशी संपर्क केला होता. त्यातून श्रीगुरुजी रुग्णालयाने हा प्रकल्प राबवावा असे प्रकल्प अधिकाऱ्यांनी ठरविले व रुग्णालयानेही कसल्याही नफ्याची अपेक्षा न ठेवता उपलब्ध निधीतून हे सर्वेक्षण करण्याचे मान्य केले.

या तीनही तालुक्यातील कातकरी समाज हा अतिमागासलेला समाज आहे. शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प. १००% भूमीहीन त्यामुळे शेतमजूरी हाच मुख्य व्यवसाय. पावसाळ्याचे चार महिने सोडले तर जगण्यासाठी होणारे स्थलांतर खूपच मोठ्या प्रमाणावर असते. हे सर्वेक्षण करताना या तिन्ही तालुक्यातील प्रत्येक पाड्यावर, प्रत्येक झोपडीत, दरी-डोंगरावर जेथे जेथे कातकरी राहतो त्या प्रत्येक ठिकाणी जाऊन त्याची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्याच्या घराची माहिती, कुटुंबाबद्दलची माहिती तसेच पिण्याचे पाणी मिळण्याचे ठिकाण, वीज, रेशनकार्ड,जातीचा दाखला, शिक्षण, जमीन या सर्व बाबींची माहिती घेण्यात आली. आरोग्य तपासणी करताना आढळलेल्या आजारांवर लगेचच औषध उपचार करण्यात आले. गंभीर आजार असलेल्यांना किंवा ज्यांना तज्ज्ञ डॉक्टरांच्या तपासणीची आवश्यकता आहे त्यांना लगेचच जवळील प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा सिव्हिल हॉस्पिटल, नाशिक येथे पाठविण्यात आले. या कालावधीत प्रत्येक ठिकाणी दोन वेळा भेट देण्यात आली व आरोग्य तपासणी करण्यात आली. डिसेंबर २०१० ते एप्रिल २०११ या कालावधीत हे सर्वेक्षण करण्यात आले. या कालावधीत प्रत्येक ठिकाणी दोन वेळा भेट देण्यात आली व आरोग्य तपासणी करण्यात आली. या तपासणीत आढळून आलेल्या काही मुख्य बाबींचा उहापोह खालील काही मुद्यांच्या आधारे केला आहे.

**स्थलांतर**

या काळात स्थलांतराचे प्रमाण खूप मोठे असते.काही कुटुंबे रोजगारासाठी तालुक्यातच अन्य ठिकाणी अथवा शेजारील तालुक्यात गेलेली आढळली त्यांची आरोग्य तपासणी त्या ठिकाणी जाऊन करण्यात आली. तसेच कुटुंबाची माहितीही घेण्यात आली. परंतु काही कुटुंबे रोजगारासाठी खूपच लांब गेलेली आढळली. पेठ व त्रंबकेश्वर तालुक्यातील कातकरी काहीजण गुजरात येथे मुख्यत्वे रस्ता बांधणीच्या अथवा दगड फोडण्याच्या कामावर तर काहीजण निफाड, पिंपळगाव, लासलगाव व नाशिक परिसरात द्राक्ष बागांमध्ये रोजगारासाठी स्थलांतरीत झालेले आढळले. इगतपूरी तालुक्यातील कातकरी पेण, पनवेल व शहापूर भागात विटभट्टीवर कामासाठी स्थलांतरीत झालेले आढळले. ती कुटुंबे जून महिन्यात पाऊस पडल्यावरच गावात पाड्यावर परत येतील असे समजले. त्यामुळे अशा लोकांची तपासणी होऊ शकली नाही.

**सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता**

पेठ व त्रंबकेश्वर तालुक्यातील कातकरी समाज असलेली गावे दुर्गमस्थानी असूनही त्यांची स्वच्छता इगतपूरीपेक्षा चांगली आढळली. इगतपूरीतील कातकरी समाज हा रस्त्यावरील गावात असूनही अस्वच्छ व व्यसनाधीन असलेला आढळला.

## घर

सरकारतर्फे कातकरींसाठी घरकुल मंजूर करण्यात आली असून ही योजना ब्यापैकी राबवली सुध्दा जाते. शेत जमीन ही अगदी कमी जणांकडे आहे त्यामुळे पावसाळ्यानंतर स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध नसल्याने ७ ते ८ महिने ही मंडळी रोजगारासाठी बाहेरच असतात. त्यामुळे घरांकडे दुर्लक्ष तर होतेच होते पण कुटुंबाच्या आरोग्यावर परिणाम होतो. तसेच मुलांच्या शिक्षणावर देखील होतो. त्यांचे शाळा सोडण्याचे प्रमाण वाढते. अथवा घरी मोठे कोणी नसल्याने शाळेकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध होणे खूप गरजेचे आहे.

## पाणी

पिण्याच्या तसेच वापरण्याच्या पाण्याची खूपच कमतरता आहे. खूप कमी ठिकाणी नळपाणी योजना आहे. त्याला पाणी असेलच याची काही निश्चिती नाही; पाण्याकरता मुख्यत्वे विहीर, हातपंप अथवा झऱ्यावर अवलंबून रहावे लागते. पाणी शुद्धीकरण करण्याचे कसलेही उपक्रम तेथे नसावेत. उन्हाळ्याच्या शेवटी व पावसाळ्यात याचा परिणाम दिसतो व दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजारांमध्ये वाढ होते.

## अन्य सरकारी योजना

सरकारी योजनांचा लाभ ब्यापैकी मिळालेला आहे. परंतु रोजगारासाठी स्थलांतर अथवा योग्य ती कागदपत्रे उदा. रेशनकार्ड, जातीचा दाखला नसल्यामुळे जवळपास १/३ कुटुंबांना कोणत्याही सरकारी योजनेचा लाभ झालेला नाही. यासाठीही आवश्यक ते उपाय शासनाकडून होणे गरजेचे आहे.

## शिक्षण

जिल्हा परिषदेच्या शाळा व आश्रमशाळा यामुळे प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण चांगले आहे. परंतु स्थलांतरामुळे शाळेतील अनियमितता व शाळा सोडण्याचे प्रमाण जास्त आहे. एकूण फक्त ६२ जणांनीच १० वी पुढील शिक्षण घेतले आहे. त्यात फक्त ११ मुली आहेत.

**तिन्ही तालुक्यातील ६ वर्षा खालील बालके सोडून शैक्षणिक आकडेवारी : -**

| वय | एकूण | १ली ते १० वी | १० च्या पुढे | अशिक्षित |
|---|---|---|---|---|
| ६ ते २० वर्ष | २८७३ | १५४५ | ३३ | १२९७ |
| २१ ते ३५ वर्ष | २५०७ | ४४५ | २७ | २०३५ |
| ३५ वर्षापुढील | १७८० | ७७ | २ | १७०१ |
| एकूण | ७१६० | २०६७ | ६२ | ५०३३ |
| ६ वर्षापुढील एकूण ३९५० महिलांची आकडेवारी | | | | |
| महिला | ३९५० | ७६४ | ११ | २५९५ |

## वैद्यकीय

एकूणच आरोग्य विषयक सुविधांची कमतरता खूपच जाणवली. या काळात आपण ११०७ कुटुंबामधील ३६५८ कातकरी मंडळींची दोनदा आरोग्य तपासणी केली. गंभीर आजारांचे प्रमाण कमी जाणवले तरीही एकूण ३९३ जणांना तज्ज्ञ डॉक्टरांकडे तपासणीसाठी पाठविले. पैकी १२३ मोतीबिंदूंचेच होते. तंबाखूचे व्यसन पुरुष व स्त्रीयांमध्येही आढळले. दारुचे व्यसन अपेक्षेपेक्षा खूपच कमी आढळले. अस्वच्छतेचे प्रमाण इगतपुरी तालुक्यात जास्त आढळले. लहान मुलांमध्ये गंभीर आजार आढळले नाहीत. कुपोषणाचे प्रमाणही अत्यल्प होते. मात्र १ ते ६ वर्षापर्यंतच्या वयोगटातील मुलांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झालेले असल्याने योग्य निष्कर्ष काढता येत नाही.

कमी वयात (१६ ते १७) होणारी लग्ने व घरीच होणारी बाळंतपणे यामुळे स्त्रीयांमध्ये अशक्तपणा व सांधे दुखीचे प्रमाण जास्त आढळले. जवळपास सर्वच बाळंतपणे ही घरीच होतात असे या सर्वेक्षणात आढळले. गरोदर

स्त्रीची नियमित वैद्यकीय तपासणी, योग्य आहार, लसीकरण याबाबतीत असलेली उदासीनता प्रकर्षाने जाणवली.

**मुलांचे लसीकरण**

शासनातर्फे राबविल्या जाणाऱ्या लसीकरण मोहिमेचा मात्र खूप चांगला परिणाम दिसून आला. लहान मुलांच्या लसीकरणाचे प्रमाण जवळपास ९० टक्क्यांहूनही अधिक असावे ही एक समाधानाची बाब म्हणता येईल. अंगणवाडी सेविका, प्राथमिक आरोग्यकेंद्राच्या परिचारिका व अन्य लोकांचे परिश्रम यामुळे हे शक्य झाले त्यामुळे सर्वांचे अभिनंदन करावे लागेल.

हे सर्वेक्षण पूर्ण करताना आदिवासी विकास प्रकल्पातील अधिकारी तत्कालीन आयुक्त श्री. राजुरकर साहेब, विद्यमान आयुक्त श्री. सरकुंडे साहेब, श्री. नितीन पाटील साहेब, सुश्री. संपदा मेहता मॅडम, श्री. संतोष ठुबे साहेब, श्री. पानमंद साहेब तसेच सौ. देशमुख मॅडम व श्री. देशमुख साहेब व इतर स्टाफ यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.

श्रीगुरुजी रुग्णालयाचे डॉ. गिरीश बेद्रे हे या सर्वेक्षणाचे प्रमुख होते. प्रत्यक्षात काम डॉ. विक्रांत मुंगी व मडिकल सोशल वर्कर श्री. भगवान आव्हाड यांनी केले.

पेठ, इगतपूरी व त्र्यंबकेश्वर या तिन्ही तालुक्यातील एकूण १६८७ कुटुंबातील ८२४० कातकऱ्यांची माहिती गोळा झाली. या सर्वेक्षणाची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे या सर्वेक्षणातून मिळालेली आकडेवारी ही आदिवासी विकास प्रकल्पाकरीता खूपच महत्त्वाची आहे. या माहितीच्या आधारे त्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता योजना तयार करण्यासाठी ही संकलित माहिती अतिशय उपयोगाची ठरणार आहे.

सर्वेक्षणा दरम्यान असे जाणवले की या सर्व भागात वैद्यकीय, शिक्षण व सामाजिक क्षेत्रात खूप काम करण्याची आवश्यकता आहे. श्रीगुरुजी रुग्णालयाच्या माध्यमातून लवकरच सुरू होणाऱ्या ग्रामीण विकास प्रकल्पाअंतर्गत याचा विचार करून या भागात जास्तीत जास्त काम करण्याचे ठरते आहे. अशा या ग्रामीण भागात काम करण्याची आवड असणाऱ्या कार्यकर्त्यांना श्रीगुरूजी रुग्णालयाच्या वतीने या कार्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## श्रद्धांजली



भारतातील अध्यात्माच्या क्षेत्रातील पूजनीय व्यक्तिमत्त्व सद्गुरु वामनराव पै यांचे २९ मे २०१२ रोजी निर्वाण झाले.

आपल्या रुग्णालयाच्या 'जिव्हाळा' त्रैमासिकाच्या पहिल्या अंकाच्या प्रकाशनाच्या वेळेस त्यांच्या आशीर्वचनांचा लाभ आपणास झाला होता.

आम्ही रुग्णालयाच्या वतीने त्यांनी दिलेल्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो !

# घडामोडी

१) दि. ३० एप्रिल २०१२ रोजी श्रीगुरुजी रुग्णालयाच्या नियोजित वास्तूच्या तिसऱ्या माळ्याच्या (पूर्व भाग) स्लॅब भरणी कार्यक्रमासाठी आय.एम.ए. (इंडियन मेडिकल असोसिएशन) नाशिकचे अध्यक्ष डॉ. शिरीष देशपांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

२) दि.१७/०५/२०१२ रोजी रुग्णालयाच्या नियोजित वास्तूच्या तिसऱ्या माळयाच्या (पश्चिम भाग) स्लॅब भरणी कार्यक्रमाप्रसंगी रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

३) दि. १३ मे रोजी मा. प्रा. श्री. सुहास देशमुख व भ्रष्टाचारविरोधी माहिमेचे श्री. विजयराव सानप यांच्या हस्ते रुग्णालयाच्या जिव्हाळा या त्रैमासिकाच्या पाचव्या अंकाचे प्रकाशन पार पडले. या प्रसंगी यशश्री कन्स्ट्रक्शनचे मा. श्री. विराज लोमटे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच त्यांनी जिव्हाळा त्रैमासिकाला एक वर्षासाठी प्रायोजित करण्यामागची भूमिका मांडली.

४) रुग्णालयाच्या नियोजित वास्तू (दक्षिण भाग) च्या पहिल्या माळ्याच्या स्लॅब भरणी कार्यक्रमासाठी मा. शहर संघचालक श्री. विजयराव कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

५) रोटरी क्लब, गंजमाळ, नाशिक व श्रीगुरुजी रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्रतपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीरे संत कबीर नगर, आनंदवल्ली व उत्तमनगर सिडको येथे घेण्यात आली. या शिबीराचा एकूण २७५ रुग्णांनी लाभ घेतला, तसेच ३० रुग्णांवर यशस्वीरीत्या मोतिबिंदू शस्त्रक्रिया पार पाडल्या.

आनंदवल्लीतील शिबीराचे उद्घाटन रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. विजय मालपाठक यांच्या हस्ते व सिडको भागातील शिबीराचे उद्घाटन नगरसेवक मा. श्री. डी.जी. सूर्यवंशी यांच्या हस्ते पार पडले.

६) रुग्णालयाच्या नियोजित वास्तू स्थळी डॉ. उन्मेश पत्की, श्री. आनंद अथनी, मा. कुसुमताई जगनपुरे, श्री. शैलेश हब्बु, श्री. शंकरराव तत्ववादी, श्री. कर्वे, श्री. व सौ. हार्डीकर यांनी भेट दिली व सदिच्छा व्यक्त केल्या.

७) रुग्णालयातर्फे चेतना इंजि. कं. अंबड येथे ६ मे रोजी आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबीरात २३ जणांची आरोग्य तपासणी व रक्त तपासणी रुग्णालयाचे डॉ. धनंजय देशमुख, डॉ. गिरीश चाकुरकर व श्री. बाळासाहेब सोनवणे यांनी केली.

८) जनकल्याण रक्तपेढीच्या कर्मचाऱ्यांसाठी दि. ३ व ४ मे रोजी वैद्यकीय तपासणी शिबीर घेण्यात आली. याअंतर्गत ४७ जणांची तपासणी डॉ. अमोल कदम, डॉ. धनंजय देशमुख, डॉ. गिरीश चाकुरकर यांनी केली.


९) दि. ३ जून रोजी लखमापूर ता. दिंडोरी येथे आयोजित वैद्यकीय तपासणी शिबीरात ७४ रुग्णांनी लाभ घेतला. या शिबीरात डॉ. ज्योती शेवाळे व रुग्णालयाचे डॉक्टर्स व कर्मचारी उपस्थित होते.

१०) १५ जून २०१२ रोजी ठाणे येथे व्यापारी व उद्योजकांचे श्रीगुरुजी रुग्णालयातर्फे एकत्रीकरण घेण्यात आले. या प्रसंगी ठाणे जनता स. बँकेचे चेअरमन श्री. विद्याधर वैशंपायन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. रुग्णालयाचे कार्यवाह डॉ. राजेन्द्र खैरे यांनी रुग्णालयाची सविस्तर माहिती सादर केली व नियोजित वास्तू बांधकामाच्या प्रगतीचा आलेख मांडला. रुग्णालयाच्या अर्थसमितीचे अध्यक्ष श्री. रवींद्र बेडेकर यांनी रुग्णालय सुरू करण्यामागची भूमिका मांडली व सर्वतोपरी मदत करण्याचे आवाहन केले.

११) दि. २३ जून २०१२ रोजी 'नाशिक रन'चे मा.श्री. नागेश नाडीग, श्री. पुरोहित व श्री. सुधीर येवलेकर यांनी रुग्णालयाला भेट दिली, सविस्तर माहिती घेतली व नूतन रुग्णालयासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले.

१२) विधानपरिषद विरोधी पक्षनेते ना. श्री. विनोद तावडे यांनी रुग्णालयाच्या नियोजित वास्तू बांधकामस्थळी भेट दिली, प्रकल्पाला शुभेच्छा दिल्या व मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या समवेत भाजप चे श्री. नाना नवले, श्री. बाळासाहेब सानप, स्थानिक नगरसेवक श्री. विलास शिंदे हे उपस्थित होते.

# पुस्तक परिचय



## '...आणि दोन हात'

लेखक : डॉ. वि.ना.श्रीखंडे

सौ. नंदा प्रदीप देशपांडे
९८८११४८७३५

डॉ. वि.ना.श्रीखंडे ज्येष्ठ शल्यचिकित्सक (Surgeon), यांचे हे आत्मकथनपर पुस्तक म्हणजे, फक्त डॉक्टरांनीच नव्हे, तर सर्वसाधारणपणे सगळ्याच लोकांनी माणूस म्हणून विकसित होत होत आयुष्य कसे जगावे याचा वस्तुपाठ आहे.

ह्या पुस्तकाला प्रस्तावना लाभली आहे ती सुप्रसिध्द ॲनेस्थेटिस्ट डॉ. वाय.जी. भोजराज यांची आणि डॉ. श्रीखंडे यांचे विद्यार्थी आणि आता के.इ.एम रुग्णालयाचे अधिष्ठाता, संचालक, डॉ. संजय ओक यांची. ते लिहितात की वैद्यकीय करीअर करताना उपचारासाठी दाखल झालेला 'रुग्ण' हा महत्त्वाचा, तो तुमच्या कार्यक्रमातला अडथळा नव्हे; तर तो तुमच्या 'असण्याचे' उद्दिष्ट आणि त्याच्यावर उपचार करून तुम्ही त्याच्यावर उपकार करत नसून उपचारांची संधी देऊन तो तुमचं जीवन समृध्द करतो आहे, ह्याची विनम्र जाणीव पुस्तकात ठायी ठायी आढळते. परदेशात शिकायला गेलेले डॉ. श्रीखंडे एका सहाध्यायीला म्हणतात, ''कसं वागायचं (Code of conduct) हे मला माझ्या देशात लहानपणापासूनच शिकायला मिळालं आहे. इथं मी फक्त शल्यशास्त्राची प्रगती शिकायला आलो आहे''. परदेशात कायमचे स्थायिक होण्याची संधी नाकारून मायदेशी परतायच्या मागे त्यांचा सच्चेपणा त्यांच्यावर झालेले सुसंस्कार, त्यांचा साधेपणा आणि समर्पणभाव कारणीभूत आहे.

राष्ट्रपतींचे डॉक्टर आणि त्याच अनुषंगाने राष्ट्रपतींच्या (डॉ. शंकरदयाळ शर्मा) नातेवाईकांचेही शल्यचिकित्सक म्हणून नावाजलेले डॉ. श्रीखंडे त्यांच्या संपर्कात आलेल्या थोरा-मोठ्यांचे अनुभव कथित करतानाच त्यांच्या विद्यार्थ्यांकडून, सहाध्यायींकडून काय काय शिकायला मिळाले हे सुध्दा कथित करतात. अशावेळी तो वैद्यकीय अध्यापक केवळ थोर व्यक्ती न राहता, वृत्तिविशेष होतो. असे त्यांचे विद्यार्थी डॉ. संजय ओक म्हणतात. त्यात थोडी भर घालून म्हणावेसे वाटते की ही वृत्तिविशेषंच 'संस्था' होते 'An Individual becomes an Institution.'

डॉ. श्रीखंडे यांना लहानपणापासूनच वाचेत दोष होता. त्या दोषावर मात करून व स्वत:मध्ये आवश्यक ते बदल करून पुढे एक प्रभावी वक्ते होण्यापर्यंतचा हा प्रवास रम्य आहे. मुळात तुमच्या कामात सच्चेपणा, जीव ओतून काम करायची इच्छा आणि एखाद्या टीपकागदासारखी गुणग्राहक वृत्ति ह्यांमुळे माणूस किती उंची गाठू शकतो याचे हे जीवंत उदाहरण आहे.

डॉ. श्रीखंडे यांचे वडील त्यांना म्हणत, ''सर्वसामान्य माणसाचा असामान्य सर्जन हो'' आणि त्यांनी आपल्या वडिलांची इच्छा पूर्ण केली असेच म्हणावे लागेल.

राष्ट्रपतींची सर्जरी करायच्या आधीची मनाची अवस्था आणि त्यातून त्यांनी घेतलेले निर्णय हे सगळे उलगडून सांगताना डॉ.श्रीखंडे यांनी नकळत खूप मोठा आणि महत्त्वाचा मुद्दा विषद केला आहे. आपण जर प्रत्येक गोष्टीचा फार विचार करत बसलो तर माणसाला (विशेषत्वाने शल्यचिकित्सकाला ) काही करताच येत नाही. निर्णय याचा अर्थ असा की, सगळ्या गोष्टी ज्ञात असून देखील आपण जे करणार आहोत ते बरोबर की चूक हे माहित नसताना योग्य वाटणारा मार्ग स्वीकारून ते पार पाडायचे. अपयश येईल या विचाराने जर सर्जन भांबावून गेला तर त्याला काम करता येणं अशक्य असतं. निर्णय घ्यायला खूप हुशारी नाही लागत ती वृत्ती लागते. निर्णय घ्यायची सवय करावी लागते आणि चुकांमधून शहाणपणा शिकावा लागतो. ही किती मौलिक शिकवण आहे. ही वृत्ती जोपासणे कोणालाही तितकेच

महत्त्वाचे नाही कां ?

त्यांनी त्यांच्या कृतीतून ऑपरेशन टेबलवरच्या पेशंटशी डॉक्टरने कसे वागावे हे शिकवले. ते पेशंट जवळ जाऊन त्याचा हात हातात घेऊन त्याला आश्वासक नजरेने आणि शब्दाने सांगायचे की 'सारे काही ठीक होईल'. हे सांगण्यामागे, त्यांचा स्वत:च्या कौशल्यावरचा आत्मविश्वास, विषयाचे सखोल ज्ञान आणि पेशंटबद्दलची आपुलकी अचल उभी असायची.

त्यांच्या सल्ल्याने अनेकांच्या शस्त्रक्रिया झाल्या आणि अनेकांच्या वाचल्याही. त्यांनी वैद्यकाकडे व्यावसायिक दृष्टीने पाहिले ते केवळ आलेल्या पेशंटला शास्त्राप्रमाणे आणि त्यांच्या अभ्यासानुसार सुयोग्य सल्ला आणि उपचार कसे मिळतील याच उद्देशाने. त्यांनी व्यावसायिक दृष्टीकोन जोपासला, व्यावहारिक नव्हे. Professional Attitude not Commercial !

आत्ताच्या काळात दुर्मिळ झालेली ही गोष्ट त्यांनी सोदाहरण दाखवून दिली की यशाचे शिखर गाठण्यासाठी हे आवश्यक आणि पुरेसे आहे.

त्यांच्या स्वभावातल्या Creativity मुळेही त्यांचे Nursing Home वेगळे वाटायचे. त्यांच्या परिचयाचे व स्नेही यांची नुसती यादी ऐकली तरी त्यांची थोरवी लक्षात येते. वि.दा.सावरकर, वि.वा.शिरवाडकर, व.पु. काळे, व्ही.शांताराम, प्रा. रमेश तेंडुलकर, शशी मेहता, पांडुरंगशास्त्री आठवले... ... आणि किती तरी.

तर दोन डोळे शाबूत असे पर्यंत '... आणि दोन हात' हे वाचलेच पाहिजे !

## गत तीन महिन्यांतील देणगीदारांची नावे

| | |
|---|---|
| सौ. अस्मिता अभय मराठे | नंदूरबार |
| श्री. अनंत राजवाडे | मुंबई |
| सौ. रत्नप्रभा खरे | मुंबई |
| श्री. दीपक सप्रे | मुबंई |
| सौ. मुक्ता जहागीरदार | अमरावती |
| श्री. अनंत देढे | मध्यप्रदेश |
| श्री. आत्माराम मेहेंदळे | ठाणे |
| सौ. सुवर्णा नेवलकर | ठाणे |

### नाशिक

| | |
|---|---|
| आयुर्वेद व्यासपीठ | नाशिक |
| डॉ. विजय काकतकर | नाशिक |
| श्री. रमेश देवी | नाशिक |
| श्री. मुरारी जाजू | नाशिक |
| सौ. खोपकर | नाशिक |
| श्री. शरदचंद्र बळेल | नाशिक |
| डॉ. विकास गोगटे | नाशिक |
| श्री. सीताराम देशपांडे | नाशिक |
| श्रीमती पद्मावती फाटक | नाशिक |
| श्रीमती वत्सला पुरोहित | नाशिक |

## वाक्‌विकृती ( स्पीच थेरपी ) उपचारासंबंधी....

श्रीगुरुजी रुग्णालयामध्ये मुंबई येथील प्रसिद्ध नायर रुग्णालयातील माजी वाक् विकृती चिकित्सा (स्पीच थेरपी) विभाग प्रमुख **वाक्‌विकृती तज्ज्ञ सौ. माया सांघी** या श्रीगुरुजी रुग्णालयामध्ये प्रत्येक महिन्यातील दोन दिवस उपलब्ध राहणार आहेत. तरी ज्या मुलांना / व्यक्तींना बोलताना अडखळणे, तोतरे बोलणे (Stammering / Stuttering), जन्मत: विकलांग मुलांमध्ये (Cerebral Palsy, Autism, Hyper Activity) बोलता न येणे किंवा विकृती असणे असे काही बोलण्यासंबंधी विकार असल्यास त्या त्यांचे सवलतीच्या दरात उपचार केले जातील. गरजूंनी रुग्णालयाशी संपर्क साधावा.

# श्रीगुरुजी रुग्णालय, नाशिक - हेल्थ चेकअप पॅकेजेस् ( वार्षिक )

## Fast Lab (Basic - Health Check up) Rs. 400/-

1) CBC
2) BSL - F
3) Urine Routine
4) Serum Cholesterol level
5) Serum Triglyceride
6) Serum HDL
7) Blood Pressure Measurement.

## Whole Body Checkup : Rs. 1400/-

a) Complete blood count
b) ESR
c) Blood Sugar Level (Random)
d) Urine Routine
e) Stool routine
f) Protiens
g) Blood Urea
h) Serum Creatinine
i) Lipid Profile
j) Serum Billirubin
k) X-ray Chest
l) ECG
m) Ultrasonography abdomen
n) Eye Check up - Free
o) Physician Check up

## Package for Hypertensive Patient Rs. 1900/-

| | |
|---|---|
| a) Complete blood count | 4 times in a year |
| b) ECG | 4 times in a year |
| c) Blood Sugar Level (Fasting) | Once |
| d) Blood Sugar Level (Postmeal) | Once |
| e) Lipid Profile | 2 times in a year |
| f) Serum Creatinine | 2 times in a year |
| g) Urine Routine | 2 times in a year |
| h) Physician's advice | 4 times in a year |
| i) Eye Check up - Free | |

## Package for Diabetic Patients : Rs. 2300/-

| | |
|---|---|
| a) Blood Sugar Level (Fasting) | 5 times in a year |
| b) Blood Sugar Level (Postmeal) | 5 times in a year |
| c) Complete blood count | 2 times in a year |
| d) ECG | Once |
| e) Serum Creatinine | 2 times in a year |
| f) Blood Urea | 2 times in a year |
| g) Urine Routine | Once |
| h) Urine Microalbumin | 2 times in a year |
| i) Glycosylated haemoglobin | 2 times in a year |
| j) Lipid Profile | Once |
| k) Physician's advice | 5 times in a year |
| l) Eye Check up - Free | |

## सूचना :-

- एकदा भरलेले पैसे कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.
- पॅकेजमध्ये नमूद केलेल्या तपासण्यांखेरीज अन्य कोणत्याही तपासण्यांची गरज असेल किंवा इतर कोणती सुविधा घेतली तसेच डॉक्टरांच्या ठरविलेल्यापेक्षा जास्त भेटी घेतल्यास त्याचे वेगळे पैसे आकारण्यात येतील.
- आपल्याला रुग्णालयाच्या वेळा व नियम पाळणे बंधनकारक आहे.
- डॉक्टरांच्या उपलब्धतेनुसारच आपली तपासणी होईल.
- कृपया अपॉइंटमेंट घेऊनच तपासणीस यावे त्यामुळे आपली गैरसोय होणार नाही.
- तपासणी करण्यापूर्वी १२ तास काहीही खाऊ व पिऊ नये. यावेळेत धुम्रपान व मद्यपान टाळावे व सकाळी रुग्णालयात तपासणीसाठी यावे.
- जर आपल्या पॅकेजमध्ये लघवी व संडास तपासणी करण्याचे असेल तर सकाळी येताना लघवी व संडासचा नमुना सोबत घेऊन यावा. त्यासाठी लागणारे साहित्य रुग्णालयातून घेऊन जावे.
- आपणास काही आजार असेल व त्यासाठी काही औषधे आपण घेत असाल तर ती औषधे ठरलेल्या वेळेतच थोड्या पाण्याबरोबर घ्यावीत व आजाराची कागदपत्रे व माहिती डॉक्टरांना द्यावी.
- जर आपण ठरलेल्या वेळेत येणार नसाल तर तसे आधीच रुग्णालयात कळवावे.
- जर आपण आपल्या कंपनीतर्फे आरोग्य तपसणी करण्यास आला असाल तर तसे कंपनीचे पत्र सोबत आणावे.

## नोट :-

- सार्वजनिक सुट्टी व रविवार सोडून तपासणीची वेळ घेता येईल.
- पॅकेजेस्चे दर कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय बदलू शकतात

# श्रीगुरुजी रुग्णालयाची संकल्पित वास्तू

भोसला मिलिटरी स्कूल कॅम्पस, गंगापूर रोड, नाशिक



architects : the DESIGNERS' collective, nasik.

SHREE GURUJI RUGNALAYA.

## भविष्यातील योजना

श्रीगुरुजी रुग्णालयाचे काम पाहून नाशिक येथील नामवंत अशा सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्यूकेशन सोसायटी अर्थात भोसला मिलिटरी स्कूलने पाच एकर जागा रुग्णालयाच्या भविष्यातील प्रकल्पासाठी लीजने दिली आहे. या जागेवर बांधकाम सुरु असून पहिल्या टप्प्यात आत्ता असलेल्या सर्व सुविधांसह आणखी काही अत्युच्च दर्जाच्या सेवा देण्याची योजना आहे.

* ६५ बेडस्‌चे रुग्णालय * कॅन्सर किरणोपचार विभाग * डायलिसिस विभाग * अद्ययावत रिहॅबिलिटेशन सेंटर * डॉ. मुंजे नेत्रपेढी * ग्रामीण व सेवावस्ती आरोग्य प्रकल्प सेवा. या पहिल्या टप्प्यासाठी साधारण १५ कोटी रूपये इतका खर्च अपेक्षित आहे.

***हा निधी समाजाच्या दातृत्व शक्तीवरच उभा राहील याची आम्हाला खात्री आहे.***

ह्या प्रकल्पासाठी दिलेली देणगी आयकर अधिनियम ८० जी व अधिनियम ३५ ए.सी. अंतर्गत आयकर सवलतीस पात्र आहे. कृपया देणगीचा धनादेश अथवा डी.डी. श्रीगुरुजी रूग्णालय किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान या नावाने काढावा

## श्रीगुरुजी रुग्णालयातील उपलब्ध सुविधा

- मेडिसिन विभाग
- जनरल सर्जरी व एन्डोस्कोपी विभाग
- कॉम्प्युटराइज्ड पॅथॉलॉजी विभाग
- भूल व वेदनाशमन विभाग
- ऑक्युपेशनल थेरपी विभाग
- फिजिओथेरपी विभाग
- स्त्रीरोग विभाग
- कॅन्सर विभाग
- अस्थिरोग विभाग
- नेत्ररोग विभाग
- २४ तास वैद्यकीय सेवा
- आय.सी.यू. एन.आय.सी.यू.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर्स
- एक्स रे व सोनाग्राफी
- २ डी इको व कलर डॉपलर
- मेडिकल स्टोअर
- सरकारमान्य गर्भपात केंद्र
- सरकारमान्य कुटुंब नियोजन - शस्त्रक्रिया केंद्र
- आयुर्वेद व पंचकर्म विभाग

**वाजवी दरात योग्य उपचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान संचलित
**श्रीगुरुजी रुग्णालय, नाशिक**
दुसरा मजला, उमिया अपार्टमेंट डॉ. हेडगेवार चौक, कॅनडा कॉर्नर, नाशिक ४२२ ००५.
दूरध्वनी - २३१८६०१/०२ मो. : ८३८००११२७३
website - www.shrigurujirugnalaya.com

प्रिंटेड मॅटर - बुक-पोस्ट

प्रति,